नि. दि.दावा क्र.१४/२०१६

संत गजानन महाराज –वि.– अमर शर्मा

नि.क्र. १५० लगत

**<u>वादीचे सा.क्र. २ यांचा उलटतपास प्रतिवादीचे वकील श्री. बी. के. गांधी यांचेमार्फत शपथेवर सुरु–</u>**

५१. गजानन महाराज संस्थानचे सर्व १२ विश्वस्त आज हयात आहेत. विश्वस्त वादी क्र. ९ नारायण यादवराव पाटील मयत झालेले आहेत. वादी क्र. ३ महादेव पुंडलिक पाटील मयत झालेले आहेत. वादी क्र. १० श्रीकांत शिवशंकर पाटील सध्या संस्थानचे विश्वस्त नाहीत. वरील तिन्ही वादींचे नावे मी केसमधून वगळले नाहीत. वरील तिन्ही वादींच्या जागेवर इतर विश्वस्तांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तीन नवीन विश्वस्तांपैकी दोन विश्वस्तांची नावे या प्रकरणात समाविष्ट केलेली आहेत. वादी क्र. १० श्रीकांत शिवशंकर पाटील यांच्या जागेवर नवीन नियुक्त झालेल्या विश्वताची नावे या प्रकरणात समाविष्ट केलेली नाहीत. माझ्याकडे पब्लीक ट्रस्ट रजिस्टरची (पी.टी.आर) प्रत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पब्लीक ट्रस्ट रजिस्टरमध्ये सर्व अस्तित्वात असलेल्या विश्वतांच्या नावाची नोंद असते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, बदल अर्ज मंजुर झाल्याशिवाय बदली विश्वतांची नोंद पी.टी.आर रजिस्टरमध्ये होत नाही. सर्व वादी विश्वस्त असल्याची नोंद असलेले पी.टी.आर. रजिस्टर मी या दाव्याच्या अभिलेखावर का दाखल केले नाही याचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र. २ ते १२ गजानन महाराज संस्थानचे विश्वस्त नसल्याने मी पी.टी.आर. रजिस्टरची प्रत अभिलेखावर दाखल केलेली नाही.

५२. मी संस्थानचा आम मुख्त्यार आहे. मी गजानन महाराज संस्थानमध्ये सर्व विभागाचा विभागीय प्रमुख म्हणून कार्यरत आहे. गजानन महाराज संस्थानमध्ये एकुण ४२ विभाग आहे. संस्थानच्या विश्वतांच्या सभेमध्ये माझा सहभाग नसतो. परंतु संस्थानच्या विश्वतांच्या सर्व सभेमध्ये मी हजर असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी संस्थानमध्ये फक्त सेवाधारी आहे. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये नमुद असलेला मी सेवाधारी असल्याचा मजकुर बरोबर आहे. मला वेतन मिळत नाही परंतु मला मानधन मिळते. माझे मानधन ठरलेले नाही. परंतु मला महिन्याला १५,०००/– रुपये मानधन मिळते. मला मिळत असलेल्या मानधनाचा रजिस्टर ठेवल्या जाते. माझे मानधन बँकेच्या खात्यात जमा होते. हे म्हणणे खरे नाही की, संस्थानमध्ये असलेल्या सेवाधाऱ्यांनी आम्हाला संस्थानमध्ये कर्मचारी म्हणून समाविष्ट करण्यासाठी न्यायालयामध्ये दावा दाखल केला होता.

५३. सदरचा दावा दाखल करतांना विश्वतांच्या सहीने दाखल केलेला आहे.

सदरचा दावा विश्वस्त श्री. नारायण पाटील यांच्या सहीने दाखल केलेला आहे. मला अधिकार दिले असल्यामुळे सर्व १२ ही विश्वस्त न्यायालयात पुराव्या देण्यासाठी आलेले नाहीत.

प्रश्न – तुमच्या मुख्त्यार पत्रावर सर्व विश्वतांच्या सह्या आहेत का ?

उत्तर – ठराव घेण्यात आला होता व त्यानुसार मला मुख्त्यार नेमण्यात आले.

५४. या दाव्याच्या अभिलेखावर ठरावाची प्रत दाखल केलेली आहे व तो ठराव दिनांक ०५.०८.२०२३ चा होता. आता मला अभिलेखावर दाखल असलेल्या ठरावाची प्रत दाखविण्यात आली. तो **निशाणी क्र. १६५** वर आहे. हे म्हणणे खरे आहे की, ठराव दिनांक २१.०३.२०१५ चा आहे. माझे मुख्त्यारपत्र दिनांक ०४.१०.२०२१ रोजीचे आहे. साक्षीदार आता सांगतो की, ठराव दिनांक ०५.०८.२०२३ रोजी दाखल केलेला होता. दिनांक २१.०३.२०१५ च्या ठरावाच्या अनुषंगाने याअगोदर मला मुख्त्यारपत्र देण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २१.०३.२०१५ च्या ठरावाशिवाय इतर कोणताही ठराव नाही. हे म्हणणे खरे आहे की, संस्थानने दाखल केलेल्या १२ दिवाणी दाव्याच्या ठरावामध्ये उल्लेख नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ठरावामध्ये भविष्यात येणाऱ्या जागेबाबतचा कोणताही दावा दाखल करण्याचा अधिकार असल्याचे नमुद आहे. आम मुख्त्यारपत्रावर व्यवस्थापकीय विश्वस्त यांची सही आहे. व्यवस्थापकीय विश्वस्त नियुक्त केल्याबाबतचा ठराव अभिलेखावर दाखल केलेला नाही. निळकंठ शिवशंकर पाटील हे व्यवस्थापकीय विश्वस्त असल्याबाबत पी.टी.आर. रजिस्टर अभिलेखावर दाखल केलेला नाही.

प्रश्न — पी.टी.आर. रजिस्टरमध्ये व्यवस्थापकीय विश्वस्त म्हणून निळकंठ शिवशंकर पाटील यांची नोंद आहे का ?

उत्तर – त्याबाबतचा बदल अर्ज प्रलंबीत आहे.

५५. व्यवस्थापकीय विश्वस्त नियुक्त केल्याची दिनांक १९.०८.२०२१ रोजीच्या ठरावाची प्रत मी अभिलेखावर का दाखल केली नाही याचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, व्यवस्थापकीय विश्वस्त नियुक्त झाल्याबाबतची पुरसिस निशाणी क्र. ७६ मी अभिलेखावर दाखल केली आहे. दिनांक १९.०८.२०२१ रोजीच्या ठरावानुसार निळकंठ शिवशंकर पाटील यांची व्यवस्थापकीय विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, पुरसिस निशाणी क्र. ७६ वर व्यवस्थापकीय विश्वस्त श्री. निळकंठ शिवशंकर पाटील यांची सही नाही.

५६. मागील ३५ वर्षांपासून मी सेवाधारी म्हणून काम करीत आहे. मी २० वर्षांचा

असतांना सेवाधारी म्हणून काम करण्यास सुरुवात केली.

प्रश्न – तुम्ही सेवाधारी नियुक्त होण्यापुर्वी काय घडले याबाबत तुम्हाला माहिती नाही?

उत्तर – अभिलेख पाहून मला सांगता येईल.

५७. हे म्हणणे खरे आहे की, यापुर्वी विश्वस्त श्री. पंकज शितुत यांनी पुरावा देण्यासाठी प्रतिज्ञालेख दाखल केला होता. श्री. पंकज शितुत यांनी तब्येतीच्या कारणामुळे पुढील पुरावा दिलेला नव्हता. दिनांक १९.०८.२०२१ रोजी ठराव करण्यासाठी श्री. पंकज शितुत हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०४.१०.२०२१ रोजी झालेल्या ठरावाच्या वेळेस सुध्दा श्री. पंकज शितुत हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, विश्वस्त श्री. पंकज शितुत यांची तब्येत बरी झाल्यानंतरही ते न्यायालयात पुरावा देण्यास हजर झाले नाही कारण की त्यांना खोटा पुरावा द्यायचा नव्हता. दिनांक ०४.१०.२०२१ रोजीच्या मुख्त्यारपत्रामध्ये मला पुरावा देण्याचा अधिकार देण्यात आला होता. आता मला निशाणी क्र. १६४ वरील आम मुख्त्यारपत्र दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये मला तोंडी पुरावा देण्याचा अधिकार दिल्याबाबतची बाब नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, श्री. निळकंठ शिवशंकर पाटील यांच्या वतीनेच मला न्यायालयात हजर होण्याबाबतचा अधिकार देण्यात आला होता.

५८. हे म्हणणे खरे आहे की, मंदिराच्या उत्तरेकडे असलेल्या पूर्व मुखी व पश्चिममुखी दोन इमारतीत दुकानाचे गाळे स्थित आहेत. मंदिराला एकुण तीन दरवाजे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मुख्य दरवाजा सन २०१७ मध्ये बंद करण्यात आला होता. एक वर्षापासून मुख्य दरवाजा उघण्यात आला आहे. विभागीय आयुक्त यांच्या आदेशान्वये मुख्य दरवाजा उघडण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, मंदिराच्या उत्तर बाजुला एक आतमध्ये येण्याकरीता व एक बाहेर जाण्याकरीता असे दोन दरवाजे निर्माण करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मंदिराच्या पूर्व व पश्चिम बाजुच्या इमारतीच्या मध्ये १०० फुट जागा सोडलेली आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ६० ते ७० फुट जागा सोडलेली आहे. मी सोडलेल्या जागेची मोजणी केलेली नाही. न्यायालयाने आदेश दिला तर ६० ते ७० फुट सोडलेल्या जागेची मोजणी करता येईल. हे म्हणणे खरे नाही की, सण त्योहाराच्या वेळी ६० ते ७० फुट सोडलेल्या खुल्या जागेवर भजन किर्तन केल्या जाते. हे म्हणणे खरे नाही की, आतमध्ये येणाऱ्या भक्त लोकांना बॅरीकेट्स लावल्यामुळे खुल्या जागेवरुन पुढे जाता येत नाही.

प्रश्न – मंदिरात प्रवेश करणारे भक्त पश्चिम बाजुच्या इमारतीच्या मागे असलेल्या गल्लीत ३ फुटाच्या जागेवर मंदिरात समाधीकडे जाण्यासाठी रस्ता तयार करण्यात आलेला आहे?

उत्तर – ८ ते १० फुटाच्या जागेवर भक्तांना जाण्यासाठी रस्ता तयार करण्यात आलेला आहे. भक्त दोन्ही बाजुने जातात.

५९. हे म्हणणे खरे आहे की, दुकानाचे गाळे असलेल्या दोन्ही इमारतीच्या समोर असलेल्या दुकानासमोर १० फुटाचा व्ऱ्हांडा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मंदिरात येणारे भक्त खरेदी करण्यासाठी १० फुटाच्या व्ऱ्हांड्याचा वापर करतात. हे म्हणणे खरे आहे की, १० फुटाच्या व्ऱ्हांड्याच्या समोर खुली जागा आहे. मंदिराच्या प्रवेश द्वारापासून दुकानाचे गाळे असलेले एका इमारतीचे अंतर २० फुट आहे व दुसऱ्या इमारतीचे अंतर १०० ते १५० फुट आहे.

**प्रतिवादीच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| **(एन. डी. मेश्राम)** | **(एन. डी. मेश्राम)** |
| दिवाणी न्यायाधीश कोर्ट क्र.१, शेगांव | दिवाणी न्यायाधीश कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.१२.०२.२०२५ | दि.१२.०२.२०२५ |